

विद्यार्थी साहाय्यक समिती

सर्वांगीण शिक्षणातून युवा सक्षमीकरण

ISO 9001-2015 Certified

# विद्यार्थी साहाय्यक समिती, पुणे

## Vidyarthi Sahayyak Samiti, Pune

ग्रामीण भागातील 325 मुलींसाठीच्या
पुण्यातील सुसज्ज वसतिगृहाचे स्वप्न साकार...

## वार्षिक अहवाल 2023-2024

www.samiti.org

# संस्थापक




फ्रान्समध्ये डॉक्टर ऑफ सायन्सच्या पदवीसाठी अभ्यास करताना तेथील विद्यार्थ्यांना मिळणाऱ्या सुविधा बघून अच्युतरावांच्या मनात विद्यार्थी साहाय्यक समितीच्या कार्याचे बीजारोपण झाले. भारतात परतल्यानंतर कै. हरिभाऊ फाटक, ग. प्र. प्रधान, शांता मालेगावकर, सुमित्रा केरकर यांसारख्या ध्येयनिष्ठ कार्यकर्त्यांशी विद्यार्थी साहाय्यक समितीच्या कामाविषयी चर्चा करून या कामाला प्रारंभ केला. पुण्यात उच्च शिक्षणासाठी येणाऱ्या गरजू व होतकरू अशा ५ विद्यार्थ्यांची वाराने जेवणाची सोय केली. पुढे अल्प दरात निवास, भोजनाची सोय करताना या विद्यार्थ्यांचा व्यक्तिमत्व विकास घडवणे, त्यांच्या आयुष्यात परिवर्तन करणे, त्यांना सुजाण, जबाबदार नागरिक बनवणे हे समितीच्या कार्याचे मुख्य उद्दिष्ट होते आणि आजही आहे.

संस्थापक
कै. डॉ. अच्युत शंकर आपटे



### कै. सुमित्रा केरकर

समितीच्या पहिल्या कार्यकर्त्या. समितीचे सुरुवातीचे काम यांच्या घरातून सुरू झाले. आर्थिक साह्य मिळवण्याच्या कामात भरीव योगदान होते.



### कै. हरिभाऊ फाटक

स्वातंत्र्यसेनानी आणि समितीचे संस्थापक सदस्य. समितीच्या स्थापनेनंतर बराच काळ विश्वस्त मंडळाचे अध्यक्ष.

# विश्वस्त मंडळ



**पद्मश्री प्रताप पवार**
अध्यक्ष,
सकाळ माध्यम समूह



**भाऊसाहेब जाधव**
कायम विश्वस्त,
कार्याध्यक्ष,
मराठवाडा मित्रमंडळ, पुणे



**विजय पुसाळकर**
कायम विश्वस्त,
अध्यक्ष, इंडो शॉटले प्रा. लि.



**तुषार रंजनकर**
कार्यकारी विश्वस्त,
उद्योजक



**संजय अमृते**
खजिनदार,
बँकिंग व वित्त क्षेत्र



**रत्नाकर मते**
अभियांत्रिकी सल्लागार



**तुकाराम गायकवाड**
उद्योजक



**डॉ. मकरंद फडके**
व्यवस्थापन सल्लागार



**प्रीती राव**
सामाजिक कार्यकर्त्या



**डॉ. ज्योती गोगटे**
उद्योजिका



**सुनंदा माने**
संचालक, लाही



**विनया ठोंबरे**
सामाजिक कार्यकर्त्या



**मनोजकुमार गायकवाड**
उद्योजक



**चंद्रशेखर पोतनीस**
उद्योजक



**नंदकुमार तळेकर**
आयुर्विमा सल्लागार

# प्रतापराव पवार यांची अध्यक्षपदी फेरनिवड

विद्यार्थी साहाय्यक समितीच्या अध्यक्षपदी प्रतापराव पवार यांची फेरनिवड झाली असून कार्यकारी विश्वस्तपदी माजी विद्यार्थी तुषार रंजनकर यांची तर खजिनदार म्हणून संजय अमृते यांची निवड झाली. विश्वस्त मंडळाचा कार्यकाळ एप्रिल २०२३ ते मार्च २०२६ या तीन वर्षांसाठी आहे. विश्वस्त मंडळ बिनविरोध निवडण्यात आले.

नव्या विश्वस्त मंडळात प्रतापराव पवार, भाऊसाहेब जाधव, विजय पुसाळकर, तुषार रंजनकर, संजय अमृते, रत्नाकर मते, तुकाराम गायकवाड, मकरंद फडके, प्रीती राव, ज्योती गोगटे, सुनंदा माने, विनया ठोंबरे, मनोज गायकवाड यांचा समावेश आहे.

## पोतनीस, तळेकर यांची निवड

विद्यार्थी साहाय्यक समितीच्या नवीन घटनेतील तरतुदीनुसार, स्वीकृत सदस्य म्हणून सी. ई. पोतनीस यांची निवड करण्यात आली आहे. तर कार्यकर्ता मंडळातून नंदकुमार तळेकर यांची विश्वस्त म्हणून निवड झाली आहे.

# समिती

## समितीचे घोषवाक्य

- सर्वांगीण शिक्षणातून युवा सक्षमीकरण

## ध्येय (Mission)

- समाजाच्या मदतीने आर्थिकदृष्ट्या गरजू आणि होतकरू युवकांच्या सक्षमीकरणासाठी योग्य सुविधा व संधी उपलब्ध करून देणे

## समितीचे धोरण

- योग्य व्यवस्थापन व गुणवत्तापूर्ण कार्यप्रणाली
- शालेय शिक्षणानंतर शहरात शिक्षणासाठी येणाऱ्या युवावर्गाची भोजन व निवासाची उत्तम सोय करणे
- समितीची मूल्ये रुजविणे
- जात, धर्म, पंथ निरपेक्ष विकास
- कालानुरूप विविध कौशल्ये विकसित करण्यासाठी संधी उपलब्ध करून देणे
- युवकांच्या सक्षमीकरणासाठी व उद्योजकता रुजविण्यासाठी प्रयत्न करणे
- सामाजिक उत्तरदायित्वाची जाणीव असलेल्या व्यक्ती आणि संस्था यांच्यातर्फे आर्थिक तथा सर्वंकष पाठबळ मिळविण्याचे सतत प्रयत्न करणे.

## मूल्ये

- स्वच्छता, समता, श्रमप्रतिष्ठा, स्वावलंबन, व्यक्तिमत्त्व विकास, समाजाप्रती उत्तरदायित्व

## हेतू

- उच्चशिक्षणासाठी गरजू व होतकरू ग्रामीण विद्यार्थ्यांना अत्यल्प दरात वसतिगृह व भोजन यांची उत्तम सुविधा पुरवणे. दुर्बल घटकांतील विद्यार्थी आत्मविश्वासपूर्ण, स्वावलंबी व समाजाचा जबाबदार घटक व्हावेत, यासाठी पोषक वातावरण व तज्ज्ञांचे मार्गदर्शन उपलब्ध करून देणे. त्यातून सामाजिक स्तर उंचावणे.

ग्रामीण भागातून उच्च शिक्षणासाठी पुण्यात येणाऱ्या गरीब, हुशार आणि होतकरू विद्यार्थ्यांसाठी अल्प दरात निवासाची व भोजनाची सोय व्हावी व त्यांचा व्यक्तिमत्त्व विकास व्हावा, कालानुरूप नोकऱ्या कमी होत असल्याने विद्यार्थ्यांना स्वावलंबी बनविण्यासाठी किमान १० टक्के उद्योजक घडावे, हा विद्यार्थी साहाय्यक समितीचा उद्देश आहे. हजारो विद्यार्थ्यांच्या जीवनात परिवर्तन घडविणारी संस्था आणि युवा परिवर्तनाचे केंद्र म्हणून समितीच्या कामाकडे पाहिले जाते. समिती धर्मादाय आयुक्त कार्यालयाकडे सार्वजनिक विश्वस्त अधिनियम १९५० अंतर्गत नोंदणीकृत (क्र. २१९ ई, पुणे) असून संस्थेचे कार्यक्षेत्र संपूर्ण भारतभर आहे.

समाजातील आर्थिकदृष्ट्या दुर्बल परंतु गुणवत्तेच्या जोरावर काहीतरी ध्येय ठेवून धडपडणाऱ्या विद्यार्थी-विद्यार्थिनींना मदतीच्या हेतूने ज्येष्ठ गणितज्ज्ञ डॉ. अच्युतराव आपटे, स्वातंत्र्यसेनानी हरिभाऊ फाटक, सुमित्राताई केरकर आदींनी १९५५ मध्ये या कामाला सुरुवात केली.

## समितीचे उपक्रम

- **दैनंदिन योगासने** – प्रत्येक विद्यार्थ्याला रोज सकाळी अर्धा तास योगासने अनिवार्य आहेत. सकाळी लवकर उठण्याची व व्यायामाची सवय त्यामुळे अंगी बाणली जाते. मानसिक ताणतणावाचे व्यवस्थापन शक्य होते. योगासनानंतर गरम दूध विद्यार्थ्यांना दिले जाते.

- **चार तास काम योजना** – समितीतील प्रत्येक विद्यार्थ्याला संस्थेसाठी रोज अर्धा तास (आठवड्यातून चार तास) कामासाठी द्यावे लागतात. स्वच्छता, कार्यालयात, भोजनालयात काम असे त्याचे स्वरूप असते. त्यातून श्रमसंस्काराची जाणीव दृढ होते

- **कमवा व शिका योजना** - समितीमध्ये स्वावलंबन व अर्थार्जनासाठी कमवा व शिका ही योजना अनिवार्य आहे. या योजनेत काम केल्याने श्रमसंस्कार लक्षात येऊन पैशाचे मोल कळते, संभाषण कौशल्य, कामाची जबाबदारी, स्वावलंबन, व्यवहाराचे अनौपचारिक शिक्षण मिळते. त्यांचा महिन्याचा खर्च भागण्यास व पालकांवरील आर्थिक ताण कमी होण्यास मदत होते.

- **पाल्य पालक योजना** - समितीला पालकत्व योजनेत देणगी देणाऱ्या साहाय्यदात्याला विद्यार्थी महिन्यातून एकदा त्यांच्या घरी जाऊन भेटतात. त्यांची विद्यार्थ्याच्या शिक्षणाविषयी, कौटुंबिक स्थितीविषयी चर्चा होते, त्यातून विद्यार्थ्याला मार्गदर्शन मिळते व त्याची प्रगती साधण्यास मदत होते. एक ग्रामीण घर एका शहरी घराशी जोडले जाते.

## विद्यार्थ्यांसाठी सुविधा

एका खोलीत तीन किंवा चार विद्यार्थ्यांची खोलीच्या आकारानुसार व्यवस्था केली जाते. खोलीत प्रत्येकाला कॉट, गादी, टेबल, खुर्ची, कपाट, पंखा आदी व्यवस्था पुरवली जाते.



सकाळची योगासने

- **भोजनालय -** समितीत प्रवेश झाल्यावर विद्यार्थ्याला येथील भोजन घेणेच अनिवार्य असते. रोज सकाळी आणि रात्री अशा दोन वेळेला जेवणाची व्यवस्था आहे. या वयोगटाचा विचार करून तज्ज्ञाच्या सल्ल्याने आहाराचे नियोजन असते. विद्यार्थ्यांनी आपले ताट स्वतः स्वच्छ करायचे असते. भोजनालय स्वच्छ ठेवण्याची जबाबदारी विद्यार्थ्यांची असते.
- **ग्रंथालय -** वसतिगृहनिहाय स्वतंत्र ग्रंथालयाची सुविधा आहे. क्रमिक आणि अवांतर तसेच ऑनलाईन पुस्तकेही उपलब्ध असतात.
- **संगणक -** विद्यार्थ्यांसाठी सुसज्ज संगणक कक्ष आहेत. अभ्यासक्रमाशी निगडीत गोष्टींसाठी विद्यार्थी याचा उपयोग करू शकतात. लॅपटॉप लायब्ररी सुरू केली असून गरजेनुसार विद्यार्थ्यांना लॅपटॉप उपलब्ध करून दिले जातात.
- **आरोग्य केंद्र -** प्रवेश झाल्यावर प्रत्येक विद्यार्थ्याची आरोग्य तपासणी केली जाते. प्राथमिक उपचाराकरिता डॉक्टरांची सेवा आहे.
- **क्रीडा -** विद्यार्थ्यांना संस्थांतर्गत आणि क्रीडांगणावर खेळण्यासाठी क्रीडासाहित्य उपलब्ध करून दिले जाते. विविध खेळांमध्ये सहभाग नोंदवून शारीरिक, मानसिक तंदुरुस्तीबरोबरच स्पर्धेत सहभागी होऊन हार-जीतीचे प्रशिक्षण नकळत मिळते.
- विद्यार्थी विकास केंद्र व उद्योजकता विकास या माध्यमातून विद्यार्थ्यांच्या व्यक्तिमत्व विकासासाठी व उद्योजकतेकडे वळविण्यासाठी विविध उपक्रम राबवले जातात. वेगवेगळ्या क्षेत्रातील तज्ज्ञांचे मार्गदर्शन विद्यार्थ्यांना उपलब्ध करून दिले जाते. गरजेनुसार समुपदेशनाची सोयही उपलब्ध आहे.



चार तास काम योजनेतील श्रमप्रतिष्ठा



कमवा व शिकामधील सहभाग

## प्रताप पवार, अध्यक्ष

# परदेशी देणगीदारांची साथ



समितीच्या कामाचा आयाम विस्तारतो आहे. गर्जे मराठी संस्थेतर्फे अमेरिकेत आयोजित केलेल्या संमेलनात यावर्षी प्रथमच समितीला सहभागी होता आले. त्यामुळे तेथील भारतीयांना समितीचे काम जवळून अनुभवता आले. समिती मित्र संकल्पना राबवून अनेक अनिवासी भारतीय समितीच्या कार्याशी जोडले गेले आहेत. समितीच्या इतिहासात पहिल्यांदाच परदेशी देणगीदारांमार्फत सुमारे पाच कोटी रुपये देणगी मिळाली आहे. तेथील काही संस्थांनी समितीच्या विद्यार्थ्यांना कमवा- शिका योजनेत संधी द्यायची ठरवून तशी कामे दिली आहेत. काही जण या विद्यार्थ्यांना ऑनलाईन मार्गदर्शन करत आहेत. विश्वस्त डॉ. मकरंद फडके यांची दूरदृष्टी आणि त्यांचे प्रयत्न, तुकाराम गायकवाड यांनी अमेरिका दौऱ्यात केलेला समिती कार्याचा प्रसार आणि परदेशी पाहुणे पुण्यात आल्यानंतर कार्यकर्त्यांनी दाखविलेले समितीचे काम, विद्यार्थ्यांशी संवादातून पाहुण्यांवर पडलेला प्रभाव, या सर्वांतून हे शक्य झाले आहे.

यावर्षी अजून एक महत्त्वाची गोष्ट म्हणजे समितीच्या घटनेत कालसुसंगत उद्दिष्टे वाढविली आणि त्याला धर्मादाय कार्यालयाची मंजुरी घेतली. त्यामुळे अजून कार्यविस्तार शक्य होणार आहे. विश्वस्त मंडळाची त्रैवार्षिक निवडणूक समितीच्या प्रथेप्रमाणे बिनविरोध झाली. नव्या मंडळात दोन विश्वस्तांची भर पडली. सल्लागार मंडळाची पुनर्रचना झाली. याला संलग्न इंडस्ट्री कौन्सिल अशी एक संकल्पना यावर्षी नव्याने सुरू केली. समितीने सुरू केलेल्या उद्योजकता विकास उपक्रमासाठी या कौन्सिलची मदत होणार आहे.

ग्रामीण भागातून उच्च शिक्षणासाठी पुण्याला येण्याचे मुलींचे प्रमाण गेल्या काही वर्षांपासून वाढते आहे. सुरक्षितता आणि परवडणारा खर्च म्हणून समितीकडे या मुलींचा ओघ वाढत होता. त्यांची सोय व्हावी म्हणून गेले काही वर्षे प्रयत्न सुरू होते. त्याला यश आले असून पुण्यातील मुलींसाठीचे वसतिगृह बांधून पूर्ण झाले आहे. या शैक्षणिक वर्षात येथे ३३६ मुली प्रवेश घेतील. तसेच अहमदनगर येथेही मुलींच्या वसतिगृहाचे बांधकाम झाले असून तेथेही या वर्षी ६० मुलींसाठी प्रवेश होणार आहेत. तसेच तेथे मुलांसाठी एक वसतिगृह वर्षभरात उभे राहील. नगरमधील मुलींच्या वसतिगृहासाठी परिमल आणि प्रमोद चौधरी फाउंडेशनने पाच कोटी आणि मुलांसाठीच्या वसतिगृहासाठी दुबईस्थित उद्योजक विनोद जाधव यांनी पाच कोटी रुपयांची मदत केल्याने हे प्रकल्प वेळेत आकाराला येत आहेत. समिती त्यांची ऋणी आहे. विद्यार्थी संख्या वाढली की तूट वाढते. यावर्षी विद्यार्थी संख्या जवळपास पाचशेने वाढते आहे म्हणजे सुमारे दीड कोटी रुपयांची वार्षिक तूट वाढणार आहे. पालकत्व योजनेत देणगीदारांची संख्या वाढवून ही तूट भरून काढण्याचे आव्हान आम्हा सर्वांसमोर आहे.

### उद्योजकता विकास उपक्रम

समितीच्या विद्यार्थ्यांनी येथील सुविधांचा लाभ घेऊन केवळ नोकरीयोग्य होण्याचा विचार न करता उद्योजकतेचा विचार करावा म्हणून समितीने प्रयत्न सुरू केले आहेत. समितीच्या कार्यावर देणगीदारांचा विश्वास आहे, नवनवीन कार्यकर्ते या कार्याला जोडले जात आहेत. माजी विद्यार्थी वेळेच्या रुपात तसेच वैयक्तिक किंवा आपल्या कंपन्यांतून सीएसआर अंतर्गत समितीला आर्थिक साहाय्य करत आहेत. यासाठी आम्ही कायमनिधी गोळा करत आहोत. ज्यामुळे हा प्रकल्प बहुअंगाने वाढेल आणि यशस्वी होईल.

इतकी सारी ऊर्जा या विधायक कार्याला लाभल्याने अनेक गरजू आणि होतकरू विद्यार्थ्यांना आपले उच्च शिक्षणाचे स्वप्न साकार करण्यास मदत होत आहे. आपणही आपल्या परीने या शैक्षणिक कार्यात सहभाग नोंदवावा, असा आग्रह आहे.

## तुषार रंजनकर, कार्यकारी विश्वस्त

# युवा परिवर्तनाचे व्रत



कार्यकर्ता, विश्वस्त म्हणून समितीचे काम पाहणे आणि **कार्यकारी विश्वस्त** म्हणून जबाबदारी स्वीकारणे यात खूप अंतर असल्याचे या वर्षभरात लक्षात आले. कार्यकर्ता म्हणून आपण एखादी जबाबदारी स्वीकारतो, आपल्या परीने ती पूर्ण करण्याचा प्रयत्न करतो. परंतु कार्यकारी विश्वस्त म्हणून संपूर्ण संस्थेचा विचार, ध्येयधोरणांचा विचार आणि तेही सर्वांना बरोबर घेऊन पुढे जात राहणे, हे एकाचवेळी अनेक गोष्टी शिकण्यासारखे असते. समितीच्या पुण्याईने समितीत **Collective Wisdom** असल्याने या गोष्टी खूप सहज आणि गुणवत्तेच्या होतात. इथे प्रत्येकाला फक्त कामातून आनंद हवा आहे व समितीचे वैशिष्ट्य म्हणजे काम करणाऱ्यास मान आहे. विद्यार्थ्यांना उच्च शिक्षणाच्या संधी लाभाव्यात, त्यांचा व्यक्तिमत्त्व विकास व्हावा, तो चांगला माणूस घडून चांगली समाजनिर्मिती व्हावी अशीच या परिवारातील प्रत्येकाची भावना आहे. त्यामुळे पद, प्रतिष्ठा याच्यापासून दूर राहून, स्वतः खर्च सोसून, संस्थेला देणगी देत ही सगळी मंडळी निरपेक्ष भावनेने जबाबादारी स्वीकारतात, ती उत्कृष्टरीत्या कशी पूर्ण होईल यासाठी प्रयत्न करतात. स्वतःच्या आयुष्यातील उत्तम अनुभव येथे पणाला लावून, बहुमूल्य वेळ देतात. येथे सर्वांनाच आपण राष्ट्रनिर्माणाकरिता प्रयत्न करीत आहोत, याचा आनंद मिळतो. संस्थेत गेली ६९ वर्षे पारदर्शकता, लोकशाही टिकून आहे. देणगीदारांचा, हितचिंतकांचा या कार्यावर विश्वास आहे तो यामुळेच.

**सामाजिक कार्याचाही एक उत्तम ब्रँड** होऊ शकतो, असे समितीच्या कामाकडे पाहून अनेकजण म्हणतात. हे कार्य म्हणजे केवळ लॉजिंग, बोर्डिंग किंवा विद्यार्थ्यांना सुविधा नाहीत तर युवा परिवर्तन म्हणून घेतलेले व्रत आहे, अशी सर्वांची भावना आहे. तरुण वयातील विद्यार्थ्यांमध्ये गुणात्मक बदल होण्यासाठी संस्थापकांपासून अनेकांनी व्यापक विचारांतून विविध उपक्रम सुरू केले. पहाटेची योगासने असतील, रोजचे श्रमप्रतिष्ठेचे अर्धा तास काम असेल, कमवा-शिकामधील सहभाग किंवा दरमहाची देणगीदार पालक भेट असेल, विद्यार्थी विकास केंद्राच्या उपक्रमातील सहभाग या साऱ्यांमागे व्यक्तिमत्त्व विकासाचा मूलभूत विचार आहे. काळानुरूप त्यात वाढ होत आहे. त्यातून या तरुणाईत ज्या मूल्यांची पेरणी होते, संवर्धन होते त्यामुळे त्यांचे आयुष्य बदलून जाते.

समितीत विद्यार्थ्यांना मिळणारे श्रमसंस्काराचे महत्त्व, देणगीदारांना भेटताना त्यांच्याकडून लक्षात येणारा दातृत्वाचा गुण, कार्यकर्त्यांबरोबरच्या संवादातून नकळत होणारा निस्पृहतेचा संस्कार, विद्यार्थी व्यवस्थापनामुळे त्यांचा प्रत्यक्ष कार्यसहभाग यामुळे ही माझी समिती, असा विचार इथल्या प्रत्येक विद्यार्थ्याच्या मनात खोलवर रुजला जातो. शिक्षण होऊन बाहेर पडल्यावर बाहेरच्या जगातील समाजाच अनुभव घेताना त्याला त्याचे वेगळेपण लक्षात येते आणि त्याचा पाया समिती असल्याने माजी विद्यार्थ्याच्या रुपाने तो परत मातृसंस्थेकडे धाव घेतो कारण त्याच्या मनात संस्थेविषयी कृतज्ञतेचा भाव असतो. त्याने इथे अनेक उपक्रमात नोंदविलेला सहभाग त्याचे इथले नाते घट्ट करतो. संस्थेला वेळेच्या रुपाने, आर्थिक रुपाने शक्य होईल तशी मदत करतो. त्यामुळे एका बाजूला गरजू विद्यार्थी, दुसऱ्या बाजूला या परिस्थितीवर मात करत स्वतःचे स्थान निर्माण केलेले माजी विद्यार्थी आणि आपण समाजाचे काही देणे लागतो या भावनेतून देणगीदार म्हणून, कार्यकर्ते म्हणून, हितचिंतक म्हणून जोडलेले स्नेहीजन या साऱ्यांच्या एकत्रित प्रयत्नांतून उत्तमतेचा ध्यास असलेले कार्य पुढे जाते आहे. वाढत्या विद्यार्थी संख्येमुळे अजून ही गरज वाढत आहे. या विधायक कार्याच्या वाटचालीत आपणही आपल्यापरीने वाटा उचलावा, आर्थिक सहकार्य करावे, पाल्य-पालक योजनेत सहभाग घेऊन विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करावे आणि त्यातील आनंद अनुभवावा अशी सर्वांनाच नम्र विनंती आहे.

# वसतिगृहनिहाय विद्यार्थी संख्या




डॉ. अच्युत शंकर आपटे वसतिगृह

**१८३ मुली**



सुमित्रा सदन


**१४६ मुली**



हरिभाऊ फाटक व

**१२२ मुले**

• मुली • मुले



| जिल्हा | मुली | मुले |
|---|---|---|
| धुळे (८) | २ | ६ |
| जळगाव (२७) | ६ | २१ |
| बुलढाणा (२१) | १३ | ८ |
| छ.संभाजीनगर (३४) | १० | २४ |
| अकोला (६) | १ | ५ |
| नाशिक (२३) | १३ | १० |
| नंदुरबार (३) | ० | ३ |
| जालना (१५) | ४ | ११ |
| झारखंड (१) | १ | ० |
| अमरावती (३) | ० | ३ |
| अहमदनगर (९१) | २८ | ६३ |
| वर्धा (१) | १ | ० |
| ठाणे, पालघर (३) | १ | २ |
| भंडारा (८) | ० | ८ |
| मुंबई (२) | ० | २ |
| वाशिम (१) | १ | ० |
| पुणे (२५१) | १३२ | ११९ |
| रायगड (२) | २ | ० |
| हिंगोली (७) | २ | ५ |
| गडचिरोली (१) | ० | १ |
| सोलापूर (४४) | १५ | २९ |
| सातारा (२८) | १४ | १४ |
| परभणी (२०) | ७ | १३ |
| चंद्रपूर (३) | २ | १ |
| सिंधुदुर्ग (६) | ४ | २ |
| नॉर्थ त्रिपूरा (१) | १ | ० |
| लातूर (३५) | १७ | १८ |
| यवतमाळ (१०) | ७ | ३ |
| कोल्हापूर (८) | ३ | ५ |
| सांगली (६) | ३ | ३ |
| धाराशिव (४०) | १८ | २२ |
| बीड (४१) | १७ | २४ |
| नांदेड (१८) | ४ | १४ |

329 + 439 = 768



सतिगृह



लजपतराय विद्यार्थी भवन

**१३२ मुले**



पी. डी. कारखानीस वसतिगृह

**१८५ मुले**

## अभ्यासक्रमानुसार विद्यार्थी यादी

| क्र | अभ्यासक्रम | मुली | मुले | एकूण |
|---|---|---|---|---|
| १ | बारावी कला | २ | ० | २ |
| २ | शेतकी अभ्यासक्रम | ० | १ | १ |
| ३ | ॲनिमेशन | १ | ० | १ |
| ४ | बी.ए. | २८ | ३१ | ५९ |
| ५ | बी.बी.ए. | ४ | ७ | ११ |
| ६ | बी.सी.ए. | २१ | १९ | ४० |
| ७ | बी.बी.ए. सी.ए. | १ | ६ | ७ |
| ७ | बी.ए.एम.एस. | १ | ० | १ |
| ८ | बी.सी.एस. | १२ | २३ | ३५ |
| ९ | बी.कॉम. | ४५ | ४६ | ९१ |
| १० | बी.ई. | ३६ | १११ | १४७ |
| ११ | बी.फार्म. | ६ | ५ | ११ |
| १२ | बी.एस्सी. | ६४ | ६० | १२४ |
| १३ | बी.एस्सी. नर्सिंग | १ | १ | २ |
| १४ | बी.टेक. | ० | २ | २ |

| क्र | अभ्यासक्रम | मुली | मुले | एकूण |
|---|---|---|---|---|
| १५ | बी.ए.एल.एल.बी. | ७ | १० | १७ |
| १६ | बी. व्होक. | ५ | ० | ५ |
| १७ | बी.पी.एम.टी. | २ | ० | २ |
| १८ | बी.पी.टी.एच. | ० | १ | १ |
| १९ | डिप्लोमा पॉलिटेक्निक | ८० | १०६ | १८६ |
| २० | डी. फार्म. | १ | ० | १ |
| २१ | हॉस्पीटल मॅनेजमेंट | १ | ० | १ |
| २२ | हॉटेल मॅनेजमेंट | ० | २ | २ |
| २३ | आय.टी.आय. | २ | ५ | ७ |
| २४ | एम. ए. | २ | ० | २ |
| २५ | एम. कॉम. | १ | ० | १ |
| २६ | एम.एस्सी. | ३ | ० | ३ |
| २७ | एम. एस. डब्ल्यू. | २ | ० | २ |
| २८ | सरफेस कोटिंग | १ | ३ | ४ |
| | **एकूण** | **३२९** | **४३९** | **७६८** |

## महाविद्यालयनिहाय विद्यार्थी यादी

| क्र | महाविद्यालय | मुली | मुले | एकूण |
|---|---|---|---|---|
| १ | आबासाहेब गरवारे कॉलेज ऑफ आर्टस अँड सायन्स | १५ | १५ | ३० |
| २ | आबासाहेब गरवारे कॉलेज ऑफ कॉमर्स | ० | २ | २ |
| ३ | एआयएसएसएमएस कॉलेज ऑफ इंजिनिअरिंग | १२ | २४ | ३६ |
| ४ | एआयएसएसएमएस कॉलेज ऑफ फार्मसी | २ | ० | २ |
| ५ | एआयएसएसएमएस पॉलिटेक्निक, पुणे | ३ | ३ | ६ |
| ६ | एआयएसएसएमएस इन्स्टिट्यूट ऑफ इन्फर्मेशन टेक्नोलॉजी | ० | ११ | ११ |
| ७ | आपटे प्रशाला | २ | ५ | ७ |
| ८ | अष्टांग आयुर्वेद कॉलेज | १ | ० | १ |
| ९ | अलार्ड इंजिनियरिंग कॉलेज अँड मॅनेजमेंट पुणे | ० | १ | १ |
| १० | आय एल एस लॉ कॉलेज | ० | ३ | ३ |
| ११ | अनंतराव पवार कॉलेज ऑफ इंजिनीअरिंग | १ | ० | १ |
| १२ | बृहन महाराष्ट्र कॉलेज ऑफ कॉमर्स | १५ | २२ | ३७ |
| १३ | बी. जे. शासकीय वैद्यकीय महाविद्यालय | २ | १ | ३ |
| १४ | बाबुरावजी घोलप महाविद्यालय | १ | ३ | ४ |
| १५ | भारती विद्यापीठ कॉलेज ऑफ इंजिनीअरिंग फॉर वुमन | १ | ० | १ |
| १६ | भारती विद्यापीठ कॉलेज ऑफ इंजिनीअरिंग, लवळे | १ | १ | २ |
| १७ | चॉईस कॉलेज ऑफ आर्ट्स अँड सायन्स | १ | ० | १ |
| १८ | कुस्रो वाडिया इन्स्टिट्यूट ऑफ इन्फर्मेशन टेक्नॉलॉजी | ४ | १ | ५ |
| १९ | डॉ. डी. वाय. पाटील आर्टस, कॉमर्स अँड सायन्स कॉलेज, आकुर्डी | १ | २ | ३ |
| २० | डॉ. डी. वाय. पाटील कॉलेज ऑफ अॅग्रीकल्चर बिझनेस मॅनेजमेंट | ० | १ | १ |
| २१ | डीईएस टेक्निकल इन्स्टिट्यूट, पुणे | १ | ३ | ४ |
| २२ | डीईएस सोसायटीज एस. के. जिंदाल कॉलेज ऑफ नर्सिंग | १ | ० | १ |
| २३ | फर्ग्युसन कॉलेज | ४६ | ३९ | ८५ |
| २४ | फ्रेम बॉक्स २.० ॲनिमेशन | १ | ० | १ |
| २५ | गेनबा सोपानराव मोझे कॉलेज ऑफ इंजिनिअरिंग | ० | १० | १० |
| २६ | गोखले इन्स्टिट्यूट ऑफ पॉलिटिक्स अँड इकॉनॉमिक्स | ३ | ० | ३ |
| २७ | शासकीय तंत्रनिकेतन पुणे | ६९ | ९२ | १६१ |
| २८ | हरिभाई व्ही. देसाई कॉलेज, पुणे | १ | ० | १ |
| २९ | इंटरनॅशनल स्कूल ऑफ बिझनेस अँड मीडिया कॉलेज ऑफ इंजिनीअरिंग, पुणे | ० | १ | १ |
| ३० | अरहम इंटरनॅशनल इन्स्टिट्यूट ऑफ इन्फर्मेशन सिक्युरिटी | ० | १ | १ |
| ३१ | के. बी. जोशी इन्स्टिट्यूट ऑफ इन्फर्मेशन टेक्नॉलॉजी | ७ | ९ | १६ |
| ३२ | कर्वे इन्स्टिट्यूट | १ | ० | १ |

| | | | | |
|---|---|---|---|---|
| ३३ | लोकमान्य टिळक इन्स्टिट्यूट ऑफ फार्मास्युटीकल सायन्स | १ | ० | १ |
| ३४ | महाराष्ट्र इन्स्टिट्यूट ऑफ हॉटेल मॅनेजमेंट अँड केटरिंग टेक्नॉलॉजी | ० | ४ | ४ |
| ३५ | मामासाहेब मोहोळ कॉलेज, पौड रोड | १ | १ | २ |
| ३६ | मराठवाडा मित्र मंडळ कॉलेज ऑफ कॉमर्स | ९ | १५ | २४ |
| ३७ | मराठवाडा मित्र मंडळ शंकरराव चव्हाण लॉ कॉलेज | १ | १ | २ |
| ३८ | मराठवाडा मित्र मंडळ कॉलेज ऑफ इंजिनीअरिंग, कर्वेनगर | ० | २ | २ |
| ३९ | मॉडर्न कॉलेज ऑफ आर्टस, सायन्स अँड कॉमर्स, गणेशखिंड | १७ | ४४ | ६१ |
| ४० | मॉडर्न कॉलेज ऑफ आर्टस, सायन्स अँड कॉमर्स, शिवाजीनगर | ५६ | ४० | ९६ |
| ४१ | मॉडर्न एज्युकेशन सोसायटी वाडिया कॉलेज ऑफ इंजिनीअरिंग, पुणे | ० | १६ | १६ |
| ४२ | मॉडर्न लॉ कॉलेज, गणेशखिंड | ० | ३ | ३ |
| ४३ | पी. ई. एस. मॉडर्न कॉलेज ऑफ इंजिनीअरिंग, पुणे | १० | १६ | २६ |
| ४४ | एम आय टी कॉलेज ऑफ इंजिनीअरिंग | ० | ३ | ३ |
| ४५ | नेस वाडिया कॉलेज ऑफ कॉमर्स | ४ | ६ | १० |
| ४६ | नवलमल फिरोदिया लॉ कॉलेज | १ | १ | २ |
| ४७ | नवरोसजी वाडिया कॉलेज | ० | १ | १ |
| ४८ | पी. जोग कॉलेज ऑफ सायन्स अँड कॉमर्स | १ | ० | १ |
| ४९ | पुना कॉलेज ऑफ फार्मसी, कोथरुड | १ | ४ | ५ |
| ५० | पुणे विद्यार्थीगृह कॉलेज ऑफ इंजिनीअरिंग | १ | ८ | ९ |
| ५१ | सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ | २ | १ | ३ |
| ५२ | समाजभूषण अप्पासाहेब जेधे कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय, पुणे | ३ | ० | ३ |
| ५३ | एस. एन. बी. पी. मारवाडी कॉलेज पिंपरी | १ | ० | १ |
| ५४ | संचेती हेल्थकेअर अॅकॅडमी | १ | ० | १ |
| ५५ | सर परशुरामभाऊ महाविद्यालय | १० | ११ | २१ |
| ५६ | सिंहगड कॉलेज ऑफ इंजिनिअरिंग | ३ | ३ | ६ |
| ५७ | श्री शाहू मंदिर महाविद्यालय, पर्वती | १ | २ | ३ |
| ५८ | श्रीमती सुधाताई मांडके कॉलेज, पौड रोड | १ | १ | २ |
| ५९ | श्रीमती नाथीबाई दामोदर ठाकरसी महिला विद्यापीठ | २ | ० | २ |
| ६० | एस एम कॉलेज, हडपसर | ० | १ | १ |
| ६१ | टेक्निकल इन्स्टिट्यूट , पुणे | १ | २ | ३ |
| ६२ | टिळक महाराष्ट्र विद्यापीठ | ३ | १ | ४ |
| ६३ | विश्वकर्मा इन्स्टिट्यूट ऑफ टेक्नॉलॉजी | ३ | २ | ५ |
| ६४ | यशवंतराव चव्हाण लॉ कॉलेज | १ | ० | १ |
| ६५ | यशवंतराव मोहिते कॉलेज आर्टस, सायन्स अँड कॉमर्स, पुणे | २ | ० | २ |
| | **एकूण** | **३२९** | **४३९** | **७६८** |

# विद्याविषयक सल्लागार मंडळाची पुनर्रचना

विद्याविषयक सल्लागार मंडळाची पुनर्रचना झाली आहे. हे मंडळ २०२३ ते २०२६ अशा तीन वर्षांसाठी कार्यरत असेल. डॉ. भाऊसाहेब जाधव हे मंडळाचे अध्यक्ष असून डॉ. ज्योती गोगटे कार्यवाह आहेत. डॉ. अरविंद नातू, डॉ. नितीन करमळकर, डॉ. (कॅ.) चंद्रशेखर चितळे, वसंत काळपांडे, सुनंदा माने, विवेक सावंत, दीपक शिकारपूर, मिलिंद जोशी, प्रकाश दीक्षित, दत्तात्रेय चितळे, तेज निवळीकर, शिरीष पटवर्धन, भारती भिडे, संजय तांबट, सम्राट कदम आदी सदस्य आहेत.

## इंडस्ट्री कौन्सिलची नव्याने निर्मिती

समितीच्या विद्यार्थ्यांना उद्योजकतेचे धडे मिळावेत म्हणून प्रथमच इंडस्ट्री कौन्सिलही स्थापन करण्यात आले आहे. प्राचार्य भाऊसाहेब जाधव या मंडळाचे अध्यक्ष असून, डॉ. ज्योती गोगटे कार्यवाह आहेत. राजीव भागवत, संजय पवार, लीना देशपांडे, असित जैन, प्रिया कोटस्थाने, अमोल शहाणे, शिवनाथ हंडे, अमर कुलकर्णी, दत्तात्रय निंभोरकर, प्रकाश आपटे, अभिजीत दातार, पांडुरंग तावरे, नरेंद्र पाटील, हनुमंत खेंगरे, शिरीष वैद्य, श्रीधर राजपाठक, अभय केले, धनाजी पुरी, अतुल टोणपे हे उद्योग क्षेत्रातील तज्ज्ञ या कौन्सिलचे सदस्य आहेत.

अमेरिकेतील गर्जे मराठीच्या अधिवेशनातील समितीचा स्टॉल



## सन २०२३ - २०२४ मधील महत्त्वाच्या घटना

- लॅपटॉप लायब्ररी संकल्पनेंतर्गत सीएसआरच्या माध्यमातून एचएनबी इंजिनिअर्स प्रा. लि. ने ७०, पर्सिस्टंटने ५०, साबा सॉफ्टवेअरने १०, सणसवाडीतील फ्रँके फॅबर इंडियाकडून १०, देणगीदार प्रकाश कुलकर्णी यांच्याकडून ८, इनरव्हील क्लब, आर्किटेक्ट राजेश पाटील यांच्याकडून प्रत्येकी एक असे १५० लॅपटॉप उपलब्ध झाले.
- डॉ. अ. शं. आपटे वसतिगृहातील संगणक कक्षाचे हेमंत नागेश भट संगणक कक्ष असे नामकरण करण्यात आले. या कक्षासाठी भट परिवाराने १० लाख रुपयांची देणगी दिली.
- अहमदनगरमध्ये कै. म. कृ. ऊर्फ मधुभाऊ चौधरी मुलींच्या वसतिगृहाच्या बांधकामास २५ मे रोजी प्रारंभ झाला.
- कार्यकर्त्यांची कार्यशाळा माथेरानला ८ व ९ जून २०२३ रोजी झाली. कार्यशाळेला३१ कार्यकर्ते उपस्थित होते.
- भारत फोर्ज आणि समितीच्या वतीने राबविलेल्या तेजस्विनी प्रकल्पाची सांगता १९ जूनला झाली. भारत फोर्जने समितीतील अभियांत्रिकी पदवी व पदविका अभ्यासक्रमाच्या २० विद्यार्थिनींची निवड करून त्यांच्या शैक्षणिक आणि समितीतील खर्चासाठी आर्थिक मदत केली. वरिष्ठ अधिकारी त्यांना मार्गदर्शक म्हणून दिले.
- विद्यार्थी विकास केंद्र आणि उद्योजकता विकास केंद्राच्या माध्यमातून २१ ते २५ जून दरम्यान पाच दिवसीय उद्यम निवासी शिबिर झाले. यात २६ विद्यार्थ्यांनी सहभाग घेतला.
- अमेरिकास्थित मराठी माणसांपर्यंत समितीची माहिती पोचवावी आणि त्यांना समितीच्या कामात सहभागी करून घ्यावे, या उद्देशाने २२ जुलै ते २ ऑगस्ट २०२३ दरम्यान समितीचे विश्वस्त तुकाराम गायकवाड यांनी अमेरिका दौरा केला. डॉ. मकरंद फडके यांच्यासह विविध शहरांमध्ये त्यांनी सुमारे २५० लोकांच्या गाठीभेटी घेतल्या. त्यापैकी अनेकांनी

मराठी बाणा कार्यक्रमातील एक प्रसंग



समितीच्या उपक्रमांमध्ये सहभागी होण्यासाठी उत्सुकता दाखविली.

- स्वातंत्र्यदिनी डॉ. आपटे वसतिगृहात प्रसिद्ध उद्योजक, फिडेल टेक्नॉलॉजीचे संस्थापक अध्यक्ष सुनील कुलकर्णी यांच्या हस्ते ध्वजवंदन झाले. फिडेल सॉफ्ट टेकच्या व्यवस्थापकीय संचालक प्राची कुलकर्णी, माहिती तंत्रज्ञान तज्ज्ञ डॉ. दीपक शिकारपूर, गर्जे मराठी ग्लोबलचे माधव दाबके उपस्थित होते.
- अमेरिकास्थित अजित दिघे, डॉ. चंद्रशेखर केळकर, श्री. व सौ. कुर्लेकर, विनायक केळकर यांनी सप्टेंबरमध्ये भारतात आल्यावर समितीच्या वसतिगृहांना भेट दिली.
- विद्यार्थी विकास केंद्र आणि इंजिनिअरिंग क्लब यांच्या वतीने समितीचे अध्यक्ष प्रतापराव पवार यांच्या उपस्थितीत अभियंता दिन साजरा झाला. सिंबायोसिस इन्स्टिट्यूट ऑफ टेक्नॉलॉजीमधील वरिष्ठ प्राध्यापक डॉ. सायली सांडभोर, रोबोटिक्सतज्ज्ञ आणि सल्लागार मुकुंद कोंडवीकर आदी उपस्थित होते.
- लजपतराय विद्यार्थी भवन, डॉ. अ. शं. आपटे व सुमित्रा सदन वसतिगृहात पर्यावरणपूरक गणेशोत्सव साजरा करण्यात आला. या तिन्ही वसतिगृहांत भारताची यशस्वी चांद्रयान- ३ मोहिम देखाव्यातून साकारली होती. सजावटीसाठी परिसरातील टाकाऊ वस्तूंचा उपयोग केला होता. गणेशोत्सवानिमित्त झालेल्या ज्ञानसत्रात डॉ. अ.शं. आपटे वसतिगृहात 'अभया' हे प्रायोगिक नाटक सादर करण्यात आले.
- कार्यकारी विश्वस्त तुषार रंजनकर यांच्या संकल्पनेतून पाचही वसतिगृहातील विद्यार्थ्यांमधून समितीची शिस्त, दैनंदिन योगासने, चार तास काम, अवलोकन, विद्यार्थी विकास केंद्राच्या कार्यक्रमांमधील योगदान तसेच विद्यार्थ्यांमध्ये असलेले विशेष कौशल्य लक्षात घेऊन वेल परफॉर्मिंग स्टुडंट म्हणून गौरवण्याचा उपक्रम सुरू करण्यात आला.
- माजी विद्यार्थिनींचा मेळावा १ ऑक्टोबर रोजी आपटे वसतिगृहात झाला. मेळाव्याला ७५ हून अधिक माजी विद्यार्थिनी उपस्थित होत्या.
- साहाय्यदाते, हितचिंतक यांच्यासाठी ३ नोव्हेंबरला बालगंधर्व रंगमंदिरात 'मराठी बाणा' हा कार्यक्रम झाला. कार्यक्रमात लेखक, दिग्दर्शक, गायक अशोक हांडे यांच्यासह १२५ कलाकारांनी नृत्य आणि गायनातून महाराष्ट्राच्या संस्कृतीचे दर्शन घडविले.
- समितीचे कायम विश्वस्त प्राचार्य भाऊसाहेब जाधव यांच्या अमृत महोत्सवानिमित्त आयोजित गौरव समारंभात समितीच्या वतीने मानपत्र देऊन त्यांचा सन्मान करण्यात आला.
- अनेक परदेशस्थ भारतीय डिसेंबरमध्ये सुटी घेऊन भारतात कुटुंबीयांच्या भेटीसाठी येतात. त्यांना एकत्रितपणे समितीत बोलावून समितीच्या विविध उपक्रमांची माहिती देण्याच्या उद्देशाने यंदा प्रथमच १९ डिसेंबरला प्रवासी भारतीय दिन कार्यक्रम आयोजित केला होता. या निमित्ताने आपटे वसतिगृहात परदेशस्थ समितीमित्रांना मेळावा रंगला. या कार्यक्रमात विविध देशांमध्ये सध्या वास्तव्य असलेले हिमांशू भट, मीनल रेणावीकर, अमित केळवकर, केतन खंडकर, शिरीष खंडकर, रश्मी बडवे, नेहा खंडकर, दीपाली कुलकर्णी आदी सहभागी झाले होते.
- उद्योजकता विकास केंद्रातर्फे २४ डिसेंबरला उद्योजकता परिषदेचे आयोजन करण्यात आले होते. यावेळी सह्याद्री फार्मचे विलास शिंदे, मार्क लॅब्जच्या व्यवस्थापकीय संचालक डॉ. वसुधा केसकर, दास ऑफशोअर कंपनीचे संस्थापक अशोक खाडे यांनी आपल्या यशस्वी उद्योगाचा प्रवास विद्यार्थ्यांसमोर उलगडला. परिषदेच्या अध्यक्षस्थानी समितीचे अध्यक्ष प्रतापराव पवार होते. पर्सिस्टंट कंपनीच्या देवांश मेहता सभागृहात

युवा साहित्य संमेलन उद्घाटन




कै. वसुधा परांजपे स्मृती पुरस्कार



झालेल्या या मेळाव्याला उद्योजक माजी विद्यार्थी तसेच उद्योजक होऊ इच्छिणारे आजी विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

- विद्यार्थी साहाय्यक समितीच्या वार्षिक दिनदर्शिकेचे प्रकाशन उद्योजकता परिषदेत मान्यवरांच्या हस्ते झाले. या दिनदर्शिकेच्या ग्लेझ्ड पेपरवर पाच हजार प्रती छापण्यात आल्या. त्याचा खर्च जाहिरातींच्या उत्पन्नातून करण्यात आला.
- ता. २९ डिसेंबरला आयुका (IUCAA) संस्थेत शैक्षणिक दौरा आयोजित केला होता. यात जे. बी. जोशी (मराठी विज्ञान परिषद, होमी भाभा राष्ट्रीय संस्था, मुंबई) यांचे व्याख्यान झाले. विद्यार्थ्यांनी आकाश निरीक्षणाचा आनंद लुटला.
- डॉ. अच्युतराव आपटे यांच्या जयंतीनिमित्त सामाजिक जाणीव प्रकल्पांतर्गत १३ जानेवारीला वीर बाजीप्रभू देशपांडे शाळेत वक्तृत्व व चित्रकला स्पर्धा घेण्यात आल्या. शाळेतील विद्यार्थ्यांनी त्यात मोठा सहभाग नोंदवला.
- **समिती आणि महाराष्ट्र साहित्य परिषद यांच्या वतीने डॉ. अ. शं. आपटे वसतिगृहातील मोडक सभागृहात १५ ते १७ जानेवारी दरम्यान युवा साहित्य संमेलन झाले. यात संमेलनाचे अध्यक्ष लेखक, कवी, दंतवैद्य डॉ. आशुतोष जावडेकर यांनी पहिल्या दिवशी विद्यार्थ्यांशी संवाद साधला. दुसऱ्या दिवशी अंजली कुलकर्णी, देवा झिंजाड, बंडा जोशी, मृणालिनी कानिटकर-जोशी या प्रसिद्ध कवींबरोबर समितीतील नवोदित कवींची मैफल रंगली. समारोप तिसऱ्या दिवशी प्रसिद्ध वक्ते, 'साधना'चे संपादक विनोद शिरसाठ यांच्या व्याख्यानाने झाला.**
- अन्नपूर्णा परिवाराच्या मेधा पुरव- सामंत आणि स्व- रुपवर्धिनी संस्थेचे शिरीष पटवर्धन यांना यावर्षीचा कै. वसुधा परांजपे स्मृती पुरस्कार देऊन गौरविण्यात आले. ज्येष्ठ विचारवंत, विश्वकोश निर्मिती मंडळाचे अध्यक्ष डॉ. राजा दीक्षित यांच्या हस्ते १५ जानेवारी रोजी या पुरस्कारांचे वितरण झाले. पाच विद्यार्थिनींना प्रत्येक १० हजार रुपयांची शिष्यवृत्ती देण्यात आली.
- प्रजासत्ताक दिनी झालेल्या पालक मेळाव्यात विद्यार्थ्यांचे विविध गावांतून आलेले पालक मोठ्या संख्येने सहभागी झाले होते. या मेळाव्याला समितीचे अध्यक्ष प्रतापराव पवार तसेच समितीचे हितचिंतक, सहाय्यदाते उपस्थित होते.
- दरवर्षी दिवाळीच्या सुटीत विद्यार्थ्यांना प्रत्येकी १०० रुपये याप्रमाणे वीस पावत्यांचे पुस्तक दिले जाते. या योजनेतून यंदा विद्यार्थ्यांनी जमा केलेले दिवाळी निधीचे १५ लाख रुपये अध्यक्ष प्रतापराव पवार यांच्याकडे सुपूर्त केले.
- प्रजासत्ताक दिनानिमित्त समितीच्या डॉ. आपटे वसतिगृहात सुप्रिया केळवकर यांच्या हस्ते, सुमित्रा सदनमध्ये अरुणा अत्रे यांच्या हस्ते आणि लजपत वसतिगृहात रिलायन्स इनोव्हेशन लीडरशीप सेंटरचे प्रमुख सुशील बोर्डे यांच्या हस्ते झेंडावंदन झाले. यावेळी विद्यार्थी- विद्यार्थिनींनी मोबाईलचे दुष्परिणाम या विषयावर पथनाट्य सादर केले.
- प्रजासत्ताक दिनानिमित्त विद्यार्थ्यांच्या कलागुणांचे दर्शन घडविणाऱ्या प्रदर्शनाचे आयोजन करण्यात आले होते. भित्तीचित्रे, व्यंगचित्रे, रांगोळी अशी विविध कलाकृतींसह विज्ञान प्रकल्पांचाही या प्रदर्शनात समावेश होता. विद्यार्थ्यांची स्पर्धाही घेण्यात आली.
- कमवा- शिका योजनेत उत्तम काम करणाऱ्या मुलांचे प्रमाणपत्र व शिष्यवृत्ती देऊन कौतुक करण्यात आले. या वर्षी समितीच्या विश्वस्त विनया ठोंबरे यांच्या मुलाने वडिलांच्या स्मृतीनिमित्त दहा विद्यार्थी- विद्यार्थिनींना शिष्यवृत्ती दिली.
- कमवा- शिका योजनेचे उद्दिष्ट, कमवा- शिका करत असताना कोणत्या गोष्टी महत्त्वाच्या असतात, याच गोष्टी भविष्यात कोणती भूमिका बजावतात, याविषयी समितीचे विश्वस्त तेज निवळीकर यांनी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले. डॉ. आपटे वसतिगृह आणि

गल्फ महाराष्ट्र बिझनेस फोरमच्या दुबईतील कार्यक्रमात समिती सदस्यांची उपस्थिती





लजपत भवन येथे मार्गदर्शन सत्र पार पडले.

- महाराष्ट्र साहित्य कला प्रसारणी सभा आणि पिंपरी चिंचवड युनिव्हर्सिटी यांच्या वतीने ३१ जानेवारीला टिळक स्मारक मंदिरात झालेल्या कार्यक्रमात संदीप वासलेकर यांच्या हस्ते विद्यार्थी साहाय्यक समितीचा मानपत्र देऊन विशेष सन्मान करण्यात आला.
- रोटरी क्लब ऑफ पुणे प्राईडच्या वतीने ३ व ४ फेब्रुवारीला विद्यार्थ्यांची आरोग्य तपासणी करण्यात आली. सलग दोन दिवस, दोन सत्रांत हे शिबिर झाले. यात दहा डॉक्टरांच्या पथकाने डोळे, रक्तदाब, वजन, उंची, हिमोग्लोबिन आणि रक्तगट आदी तपासण्या केल्या. समितीतील २२५ विद्यार्थी व २५० विद्यार्थिनी या शिबिरात सहभागी झाल्या.
- आंतरभारती संस्थेची पुणे शाखा आणि विद्यार्थी साहाय्यक समितीच्या वतीने १० व ११ फेब्रुवारीला स्वक्षमता ओळख युवती शिबिर आयोजित करण्यात आले होते. समितीतील ४५ विद्यार्थिनी यात सहभागी झाल्या होत्या.
- कॉग्निझंट कंपनीच्या ध्येय प्रकल्पांतर्गत समितीतील शेवटच्या वर्षातील विद्यार्थ्यांना प्रशिक्षण, त्यानंतर त्याच कंपनीत पात्रतेनुसार नोकरीची संधी उपलब्ध होण्याच्या दृष्टीने उपक्रम सुरू झाला.
- रथसप्तमीनिमित्त १६ फेब्रुवारीला विद्यार्थ्यांच्या सामूहिक सूर्यनमस्काराचे आयोजन केले होते.
- माजी विद्यार्थ्यांचा ३५वा मेळावा २५ फेब्रुववारीला झाला. प्रायोजकत्व मराठवाड्यातील माजी विद्यार्थ्यांनी घेतले. यावेळी राज्यभरातून सुमारे ६०० माजी विद्यार्थी उपस्थित होते.
- कमवा - शिका योजनेंतर्गत विद्यार्थ्यांनी कापडी बटवे (पाऊच) व गुढी तयार करण्याची तसेच पणत्या रंगविणे, आकाशकंदील तयार करणे अशी कामे केली.
- उद्योजकता विकास उपक्रमाला समितीचे अध्यक्ष प्रतापराव पवार यांनी दीड कोटी रुपयांची देणगी दिली. समितीच्या विश्वस्त मंडळाने या देणगीचा स्वीकार करून या योजनेला शारदाबाई गोविंदराव पवार उद्योजकता विकास आणि प्रशिक्षण कार्यक्रम असे नाव जाहीर केले.
- **उद्योजक होण्याची इच्छा असलेल्या विद्यार्थ्यांची उद्योजकीय मानसिकता तयार करण्यासाठी समितीत २३ मार्च रोजी उद्यम शिबिराचे आयोजन केले. ४७ विद्यार्थी यात सहभागी होते.**
- महिला दिनानिमित्त डॉ. अ.शं. आपटे वसतिगृहातील सभागृहात विशेष कार्यक्रम आयोजित केला होता. माजी विद्यार्थिनींनी आजी विद्यार्थिनींशी संवाद साधला.
- मुली आणि महिलांच्या सुरक्षिततेबाबत पोलिसांच्या दामिनी पथकाने विद्यार्थिनींना मार्गदर्शन केले. ५ मार्च रोजी झालेल्या या कार्यक्रमाला सहायक पोलीस निरीक्षक सीमा पाटील, कॉन्स्टेबल मीनल गायकवाड व सोनाली हिंगे उपस्थित होत्या.
- विद्यार्थी विकास केंद्राच्या वतीने वसतिगृहनिहाय घेतलेल्या विविध स्पर्धांचे पारितोषिक वितरण ज्येष्ठ अभिनेते राहुल सोलापूरकर यांच्या हस्ते झाले.
- समितीच्या वसतिगृह व्यवस्थापनासाठी ISO 9001 : 2015 हे मानांकन आहे. याचे या वर्षीचे यशस्वी ऑडिट होऊन मार्च २०२५ पर्यंत प्रमाणपत्र मिळाले आहे.
- **समितीच्या उपक्रमांची माहिती देण्यासाठी दर महिन्याच्या एक तारखेला समिती दर्पण हे मुखपत्र डिजिटल स्वरूपात करून सर्व देणगीदार, हितचिंतकांना पाठवले जाते.**
- समितीच्या विद्यार्थ्यांसाठी गेली काही वर्षे जपानी भाषेचे वर्ग घेतले जातात. याचा लाभ अनेक विद्यार्थ्यांना झाला. या वर्षी तीन विद्यार्थ्यांना जपानमध्ये नोकरी मिळाली आहे.

# समितीच्या कार्याची माध्यमांनी घेतलेली दखल



महाराष्ट्र साहित्य कला प्रसारिणी सभा, पुणे
व पिंपरी चिंचवड युनिव्हर्सिटी
यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित
विद्यार्थी साहाय्यक समिती संस्थेचा कृतज्ञता गौरव

मानपत्र

## पुढील दशक असेल भारताचे सुवर्णयुग

पुण्यातील परिसंवादात आशावाद; 'एका दिशेचा शोध'च्या २५ व्या आवृत्तीचे प्रकाशन

विद्यार्थी साहाय्यक समितीच्या परिषदेत तज्ज्ञांनी दिले कानमंत्र

## ग्राहकाला केंद्रस्थानी ठेवा, बाजारपेठ अभ्यासा

...म्हणून मराठी माणूस मागे : प्रतापराव पवार

आपटे सभागृह, पुणे : प्रशासकीय सेवेत निवड झालेल्या विद्यार्थी सहायक समितीमधील विद्यार्थ्यांचा माजी विद्यार्थी मंडळातर्फे सत्कार करण्यात आला. या वेळी प्रतापराव पवार, तुषार रंजनकर, तुकाराम गायकवाड आदी उपस्थित होते.

## आयुष्य घडविणाऱ्या समाजाचे ऋण विसरू नका

प्रतापराव पवार यांचे प्रतिपादन; प्रशासकीय सेवेत निवड झालेल्या विद्यार्थ्यांचा सत्कार

डॉ. अ. श. आपटे वसतिगृह, मोडक सभागृह : विद्यार्थी साहाय्यक समितीच्या विद्यार्थी विकास केंद्रातर्फे वसतिगृहनिहाय घेण्यात आलेल्या विविध स्पर्धांचे पारितोषिक वितरण अभिनेते राहुल सोलापूरकर यांच्या हस्ते झाले.

## 'आवडत्या विषयात करिअर करा'

## 'वाचन ही सर्वाधिक परतावा देणारी गुंतवणूक'

## पुणे उद्योजकता उपक्रमाला दीड कोटी रुपयांची देणगी

## विद्यार्थी साहाय्यक समितीला दोन कोटी ८० लाखांची देणगी

अमेरिकेतील शेंदुरे परिवाराकडून मदत

बालगंधर्व रंगमंदिर : रवींद्र धंगेकर, नंदू फडके, सूर्यकांत पाठक यांच्या हस्ते विद्यार्थी सहायक समितीला निधी प्रदान करण्यात आला.

## विद्यार्थी सहायक समितीला निधी प्रदान

पुणे : पुणे शहर व्यापारी असोसिएशन, रामेश्वर चौक तरुण मंडळ आणि जैन सोशल ग्रुप (उडान) यांच्यातर्फे आयोजित विशेष कार्यक्रमात विद्यार्थी सहायक समितीला निधी प्रदान करून गौरविण्यात आले. याप्रसंगी 'वाकडी...

## समितीमुळेच पाल्याचे पुण्यात शिक्षण शक्य

पालकांची प्रतिक्रिया; मुलांच्या व्यक्तिमत्त्वात सुधारणा झाल्याने आनंद

## समिती दर्पण

ऑगस्ट २०२४

## समितीची उद्दिष्टे साध्य होत असल्याचे सिद्ध

निवास, भोजन, सुरक्षितता, उपक्रम उत्तम असल्याचा विद्यार्थ्यांचा अभिप्राय

# साहाय्यदाते म्हणतात

## अभिमानास्पद काम



विद्यार्थी साहाय्यक समितीच्या कार्याचा ते मुलींसाठी नव्याने बांधत असलेल्या वसतिगृहानिमित्त परिचय झाला. या कार्यातील सर्व कार्यकर्त्यांचा आत्मीय सहभाग उल्लेखनीय आहे. गरजू परिवारातील विद्यार्थ्यांना चांगल्या शिक्षणासाठी सुविधा उपलब्ध करून देताना आणि शहरातल्या वातावरणाचा फायदा मिळून त्यांचा व्यक्तिमत्त्व विकास साधताना समिती वर्षानुवर्षे अथक प्रयत्न करते आहे, हे बघून समाधान वाटले. विद्यार्थ्यांना अल्पदरात वसतिगृह, भोजन व चांगल्या जीवनशैलीतील मूल्यसुध्दा इथे अंगिकारावी लागतात, हे पाहून अजूनच अभिमान वाटला. समितीच्या उपक्रमांमधून अशीच समाजसेवा उत्तरोत्तर होत रहावी आणि उत्तम नागरिक घडावेत, हीच सदिच्छा.

**हर्षल मोरडे,**
संचालक, मोरडे फूड्स प्रा. लि. मुंबई

## समितीबरोबर कामाचा बहुमान

रोश इन्फॉर्मेशन सोल्युशन्स इंडिया प्रा. लि. ला विद्यार्थी साहाय्यक समिती बरोबर काम करावयास मिळणे हा बहुमान वाटतो. आपण जिथे राहतो आणि ज्या समुदायामध्ये काम करतो त्यांच्या विकासासाठी काम करणाऱ्या सामाजिक संस्थांचे रोशला कौतुक वाटते. त्यांना मदत करण्यास कंपनी सदैव उत्सुक असते. अत्यंत आदरणीय व कंपनीसाठी अतिशय मौल्यवान असणारे कर्मचारी श्री. ज्ञानेश्वर घुगे हे विद्यार्थी साहाय्यक समितीचे विद्यार्थी आहेत. ते या संस्थेच्या उदात्त कार्याचा दाखला आहेत. सध्या समितीत राहणाऱ्या विद्यार्थ्यांना त्यांच्या उज्वल भविष्यासाठी पुरेशी डिजिटल कौशल्ये मिळावीत, यासाठी Roche Computer Lab च्या स्वरूपात समितीला पाठिंबा देताना आम्हाला खूप आनंद होत आहे.

**रोश सीएसआर टीम,**
पुणे

## होस्टेल नाही, विकासकेंद्र



समितीसारखी संस्था अस्तित्वात आहे याची मला कल्पना नव्हती. होस्टेल सगळीकडेच असतात, पण होस्टेल हे विकासकेंद्र होऊ शकते आणि त्यातून मुलांच्या भवितव्याचे शिल्प तयार होऊ शकते, असे काही असेल हे मी पहिल्यांदाच पाहिले. त्यामुळे मला खूप आनंद झाला आणि आश्चर्यही वाटले. समितीच्या कार्यासाठी खूप खूप शुभेच्छा.

**संदीप वासलेकर,**
संस्थापक, स्ट्रॅटेजिक फोरसाइट ग्रुप

## चांगले काम पाहायला मिळाले



समितीच्या वसतिगृहांची पाहणी केली. विद्यार्थ्यांशी संवाद साधला. जी अपेक्षा केली होती, त्याहीपेक्षा चांगले काम पाहायला मिळाले. समितीचे विद्यार्थी आता उद्योजकतेचा विचार करायला लागले आहेत. तुम्ही यश मिळवताना, आकाशात झेप घेताना पाय जमिनीवर ठेवा. आपली संस्कृती, मूल्य यांचा विसर पडू देऊ नका. श्रमप्रतिष्ठेचा विचार घेऊन कष्टाला प्रामाणिकतेची जोड दिल्यास उद्योजकतेचा प्रवास सुकर होतो.

**आशिष अचलेरकर,**
संस्थापक आणि मुख्य कार्यकारी अधिकारी,
नीयर यू सर्व्हिसेस, अमेरिका

# माजी विद्यार्थ्यांचे यश

## समिती संस्कार पीठ



१९८५ साली बारावीची परीक्षा उत्तीर्ण झाल्यावर नगर जिल्हयातील श्रीरामपूरसारख्या छोटया गावातून मी पुणे महानगरीत शिक्षणासाठी दाखल झालो. पुणे हे मोठे आणि प्रसिध्द शहर असल्यामुळे थोडेफार दडपण आणि बरीचशी उत्सुकता मनात घेऊन माझे पुण्यातील शिक्षण सुरु झाले. माझ्या महाविद्यालयीन जीवनात मनाला दिशा, आकार आणि प्रेरणा देणाऱ्या "विद्यार्थी साहाय्यक समिती" नावाच्या संस्कार पीठाने मला घडवले. समितीमध्ये कार्यरत विविध क्षेत्रांतील उत्तुंग व्यक्तिमत्त्वे आणि जिवाभावाचे मित्र यातून माझे व्यक्तिमत्त्व विकसित होऊ शकले. भावी जीवनातील यशाची पायाभरणी तिथेच झाली. व्यक्ती विकास या विषयाला कल्पक आणि व्यावहारिक आयाम देणारे समितीच्या छत्राखालील ते दिवस अजूनही आठवतात. कित्येकदा तर जबाबदारीच्या पदावर काम करताना घ्यावे लागणारे निर्णय आणि त्या मागचा दृष्टीकोन ह्यामध्ये मला समितीचा प्रभाव माझ्या कामामध्ये जाणवतो. स्वत:ची ओळख करुन घेत असतानाच्या त्या काळात समितीने दिलेला हात महत्वाचा ठरला. आज समितीचे कार्य विस्तारताना बघून मनापासून आनंद होतो आणि त्यामध्ये सहभाग घेताना जुने दिवस आठवतात. संस्कारित महत्वाकांक्षेचे पाय जमिनीवरती घट्ट रोवलेले राहतात. मला वाटते, स्वतःशी आणि भोवतालच्या समाजाशी इमान राखण्याचे समितीने दिलेले संस्कार माझ्यासाठी आयुष्यभराची मौल्यवान देणगी ठरलेले आहेत. वेगवेगळया क्षेत्रांमध्ये यशाची नवी नवी शिखरे पादाक्रांत करताना समितीच्या छात्रांमध्ये संस्कारपीठाचे हे देणे हृदयाशी विराजमान राहते.

**- डॉ. किरण कुलकर्णी,**

अतिरिक्त मुख्य निवडणूक अधिकारी, महाराष्ट्र राज्य.

## दुर्बलांच्या सक्षमीकरणासाठी काम



मी मुळची इगतपुरीची (जि. नाशिक). हे जरी लहान गांव असले तरी आज धम्मगिरी विपश्यना केंद्रामुळे जगाच्या नकाशावर त्याचे विशेष स्थान आहे. माझे आई – वडील धम्मगिरीशी सुरुवातीपासून जोडले गेले असल्याने मी धम्मगिरीच्या वातावरणात मोठी झाले. शालेय शिक्षण इगतपुरीत झाले. पुढील शिक्षण नाशिकच्या एच. पी. टी. महाविद्यालयातून सुरू केले. बारीवीत नाशिक बोर्डात १२ वी आले. पुढील शिक्षणासाठी पुण्याला आले. ओळखीच्या काका काकूंनी विद्यार्थी साहाय्यक समितीचा पर्याय सुचविला. कमवा व शिका योजनेमुळे एक वेगळाच आत्मविश्वास मिळाला. समितीतील विविध उपक्रमांमुळे आणि महाराष्ट्राच्या वेगवेगळ्या भागातून आलेल्या धडपड्या आणि कष्ट करणाऱ्या मैत्रिणींची साथ लाभल्याने जमिनीवर पाय घट्ट रोवून आकाशात भरारी घेण्याची स्वप्ने बघता आली.

बी. ए. ला Fergusson College मध्ये वर्गात प्रथम आले. पुणे विद्यापीठातून पदव्युत्तर शिक्षण पूर्ण करून एम. फीलची डिग्री घेतली. जर्मन सरकारची DAAD स्कॉलरशिप आणि ब्रिटीश सरकारची Chevening स्कॉलरशिप मिळाल्याने २००४ साली जर्मनी आणि २०१८ साली ब्रिटनला शिकण्याची संधी मिळाली.

एम. फिलचे शिक्षण घेता घेता 'यशदा'मध्ये संशोधन व प्रलेखन केंद्रात कामाला सुरुवात केली. विपश्यनेची पार्श्वभूमी, समितीतील वास्तव्य आणि शिक्षण घेताना आलेले अनुभव तसेच ओळखी यामुळे समाजातील दुर्बल घटकांच्या सक्षमीकरणाचे काम करण्याचा मानस प्रबळ होत गेला. संशोधन प्रकल्पात काम करताना लोक सहभागी नियोजन पद्धती विकसित करताना एक सूर गवसला. गाव स्तरावरील लोकसहभागी, एकात्मिक आणि विकेन्द्रित नियोजनाकरिता प्रशिक्षण संच तयार केला ज्याच्या आधारावर राज्यातील १५०० हून अधिक गावांमध्ये गाव विकास आराखडा तयार करण्यात आला. तसेच नियोजनासाठी आवश्यक ग्रामपंचायत स्तरावरील एकात्मिक माहिती कोष तयार करण्यास सहाय्य केले. महिला लोक प्रतिनिधींसाठी प्रशिक्षण मार्गदर्शिका केली. त्याच्या आधारे ९००० हून अधिक महिला लोक प्रतिनिधींनी प्रशिक्षण घेतले. असे वाटते की समाजोपयोगी काम करत राहणे, हा एक उत्तम मार्ग आहे, अनेकांनी आजवर माझ्यामध्ये केलेल्या गुंतवणुकीची परतफेड करण्याचा.

**प्रज्ञा दासरवार,**

समन्वयक, संशोधन सहयोग व सल्लासेवा केंद्र, यशदा

## समितीतील जडणघडण महत्त्वाची




मी अश्विनी संतोष सानप पूर्वाश्रमीची ज्ञानदा विद्यानंद देवधर. मी समितीमध्ये १९९२ ते १९९७ या कालावधीत वास्तव्यास होते. माझ्या आजोळी शेजारी निपुणगे गुरुजी राहायचे. त्यांच्या माध्यमातून कै. तांबोळी सरांची ओळख झाली आणि सरांच्या मार्गदर्शनाने समितीत प्रवेश मिळाला. मी मॉडर्न कॉलेजमधून वाणिज्य पदवी मिळविली. समितीच्या शिस्तबद्ध दिनचर्येबरोबरच विविध योजना जसे चार तास काम, कमवा व शिका याने काही प्रमाणात स्वावलंबी बनविले.

पदवीनंतर महाराष्ट्र लोकसेवा आयोगाच्या परीक्षेचा अभ्यास सुरू केला. २००० साली दुसऱ्या प्रयत्नात नायब तहसीलदार म्हणून नेमणूक झाली. त्यानंतर २००१ च्या एमपीएससी परीक्षेत पोलीस उपअधीक्षक म्हणून निवड झाली. नाशिक पोलीस अकॅडमी येथे प्रशिक्षण पूर्ण करून जळगाव व अहमदनगर येथे परिविक्षाधीन कालावधी पूर्ण केला. जयसिंगपूर, जि. कोल्हापूर, अलिबाग जि. रायगड, सोलापूर येथे सेवा बजाविली. २०१७ मध्ये भारतीय पोलिस सेवेत (आयपीएस) सामील झाले. सध्या मुंबईत महाराष्ट्र राज्य सुरक्षा महामंडळ येथे प्रतिनियुक्तीवर काम करत आहे.

आज मी जे काही काम करत आहे त्यामध्ये समितीतील जडणघडण फार महत्वाची आहे. ग्रामीण भागातील अल्प आर्थिक उत्पन्न गटातील महाविद्यालयीन विद्यार्थी विद्यार्थिनींना नाममात्र दरात राहण्याची उत्तम सोय, त्याचबरोबर त्यांचा सर्वांगीण विकास करण्याचे काम विद्यार्थी साहाय्यक समितीचे सदस्य अहोरात्र करत आहेत. या कार्याला सलाम.

**अश्विनी सानप**
आयपीएस, महाराष्ट्र राज्य सुरक्षा महामंडळ, मुंबई

## जडणघडणीत सकारात्मक प्रभाव



माझे गाव नगर जिल्ह्यातील अकोले. अकोले म्हणजे आदिवासी तालुका. सुखसुविधांचा अभाव असूनही मी दहावीत शाळेत दुसरा आलो व हीच परंपरा कायम ठेवत बारावीत ८७% मार्क्स मिळवले. पण बारावीनंतर काय? हा मोठा प्रश्न होता. वडील नोकरीनिमित्त बाहेरील प्रांतांत असायचे. आई अशिक्षित, पण आमच्या कुटुंबाचे मार्गदर्शक श्री. गंगाधर वैद्य यांच्या मार्गदर्शनाने आर्किटेक्ट होण्याचे ठरले. माझा नंबर पुण्यातील BKPS या गव्हर्मेन्ट कॅालेजला लागला त्यामुळे फीचे ओझे कमी होते, पण पुण्यात राहायचा आणि खाण्यापिण्याचा प्रश्न भेडसावत होता. घरची परिस्थिती सर्वसामान्यच होती त्यामुळे संधी मिळूनही ती सोडावी लागते की काय, अशी स्थिती झालेली असतानाच कॅालेजच्या मित्रांकडून समितीबद्दल माहिती मिळाली. कर्म धर्म संयोगाने समितीच्या वसतिगृहात प्रवेश मिळाला. अतिशय शिस्तबद्ध व अभ्यासाला पोषक अशा वातावरणाचा माझ्या व्यक्तिमत्त्वावर खूप सकारात्मक प्रभाव पडला. आदरणीय निर्मलाताई पुरंदरे, तांबोळी सरांच्या कार्यकुशलतेमुळे तर मी नेहमीच भारावून जायचो. १९८९ ला मी आर्किटेक्ट झालो. संगमनेर येथे व्यवसायास सुरूवात केली. पुढे माझी पत्नी सौ. संज्योत वैद्य हिने स्थापन केलेल्या श्री व्यंकटेश एज्युकेशन सोसायटी या संस्थेत काम करत असताना व आमच्या स्ट्रॅाबेरी इंग्लिश मीडियम स्कूलच्या १२०० विद्यार्थांना शैक्षणिक सुविधा पुरवताना आमची तारेवरची कसरत सुरू होती. त्यामुळे ठरवूनही समितीला वेळ देता येऊ शकत नव्हता. शिक्षणात खऱ्या अर्थाने आधारवड ठरलेल्या समितीसाठी आपण कोणत्या ना कोणत्या रुपाने हातभार लावावा, अशी माझी तीव्र इच्छा होती. आता माझें हे स्वप्न पूर्ण होत आहे. समितीचे नगरमध्ये मुलींसाठी जे वसतिगृह साकारले जात आहे त्याचे आर्किटेक्ट म्हणून काम पाहण्याचे भाग्य मला लाभले. परमेश्वराच्या आशीर्वादाने आणि तांबोळी सरांच्या प्रेरणेने हे घडून आले. हे लिहिताना माझ्या हृदयात कृतार्थतेची भावना दाटून येत आहे.

**आर्किटेक्ट अरविंद वैद्य**
संगमनेर, अहमदनगर

# AUDITED FINANCIALS

**VIDYARTHI SAHAYYAK SAMITI, PUNE**

Registration No. : E-219 PAN: AAATS4498N

THE BOMBAY PUBLIC TRUST ACT 1950, SCHEDULE IX [Vide Rule 17 (1)]

Amount in Rupees

## Income & Expenditure for the year ending 31st March 2024

| 2022-23 | Expenditure | 2023-24 | 2022-23 | Income | 2023-24 |
|---|---|---|---|---|---|
| | **Expenditure in respect of properties** | | 8,90,745 | Rent | 11,02,666 |
| 11,81,357 | Rates, Taxes, cesses | 12,70,912 | | **Interest** | |
| 1,17,41,087 | Major Repairs | 1,68,51,424 | 69,77,882 | On Bank Account. - on deposits. | 1,27,32,969 |
| 17,12,609 | Salaries & Terminal Benefits | 22,43,207 | 1,60,402 | - on saving a/c. | 3,93,165 |
| 17,12,309 | Establishment Expenses | 23,35,295 | | | |
| 3,15,750 | Legal Expenses. | 34,000 | 5,58,24,742 | Donation in cash or kind | 2,29,35,262 |
| 28,320 | Audit fees & Professional fees | 42,480 | 2,19,63,196 | Income from other sources | 2,56,79,064 |
| | | | 4,47,371 | Transfers from Reserves/Liabilities | 2,63,222 |
| 46,48,055 | Depreciation | 44,21,150 | | | |
| - | Transferred to Reserve / Specific Funds. | | | | |
| | **Expenses on object of trust** | | | | |
| 2,31,51,637 | Educational /Relief to poor | 2,35,04,648 | | | |
| 6,02,298 | Medical Relief | 6,81,816 | | | |
| 4,11,70,916 | Surplus c/o to Balance Sheet- # | 1,17,21,416 | | | |
| **8,62,64,338** | **Total** | **6,31,06,348** | **8,62,64,338** | **Total** | **6,31,06,348** |

As per our Report on even date.

Dated : 28th August 2024

Place: PUNE

**Tushar Ranjankar**
Managing Trustee

**Pratap G. Pawar**
President

**CA Santosh Pethe**
Torvi Pethe & Co

# Surplus is represnted by specific donations rceived towards 3 ongoing hostel projects with expcted outlay of about Rs. 44Cr.

# AUDITED FINANCIALS

## VIDYARTHI SAHAYYAK SAMITI, PUNE

Registration No. : E-219  PAN: AAATS4498N

THE BOMBAY PUBLIC TRUST ACT 1950, SCHEDULE IX [Vide Rule 17 (1)]

Amount in Rupees

### BALANCE SHEET AS ON 31ST March 2024

| 31-03-2023 | Funds & Liabilities | 31-03-2024 | 31-03-2023 | Property & Asstes | 31-03-2024 |
|---|---|---|---|---|---|
| | **Trust funds or Corpus** | | 9,05,43,967 | Immovable Properties | 22,12,22,009 |
| 10,79,13,599 | Trust funds or Corpus | 11,80,90,172 | 1,59,28,389 | Furniture & Fixture. | 1,46,04,656 |
| 14,65,89,288 | Other Earmarked Funds | 29,80,06,729 | 19,05,19,130 | Investments. | 24,99,21,658 |
| | **Liabilities.** | | 56,01,928 | Advances | 49,10,730 |
| 41,79,064 | For Expenses | 2,30,53,405 | | | |
| 44,10,850 | For Advances-OD | - | 1,52,497 | Income Outstanding - Mess Closing Stock | 1,33,003 |
| | **Income and Expen-diture Account** | | | **Cash & Bank Balance** | |
| (6,03,295) | Bal as per last Bal. Sheet : | 4,01,03,281 | 3,89,120 | Saving Account | 1,80,775 |
| 4,11,70,916 | Add : Surplus | 1,17,21,416 | 1,871 | Cash in hand | 2,172 |
| | Less: Deficit current year | | | | |
| (5,23,520) | Less:Trf to Repairs/ Reserve Fund | | | | |
| **30,31,36,902** | **Total** | **49,09,75,003** | **30,31,36,902** | **Total** | **49,09,75,003** |

The above Balance Sheet to the best of my / our belief contains a true account of the funds and liabilities and of the Property and / Assets of the Trust.

As per Report on even date.

Dated : 28th August 2024

Place: PUNE

**Tushar Ranjankar**
Managing Trustee

**Pratap G. Pawar**
President

**CA Santosh Pethe**
Torvi Pethe & Co

# Audit Report

To

**The Board of Trustees,**

Vidyarthi Sahayyak Samiti,

1184/1/4 F.C. Road, Pune 411 005.

As per our appointment, we have audited the attached Balance Sheet of Vidyarthi Sahayyak Samiti as at March 31, 2024 and also the Income and Expenditure Account for the year ended on that date annexed thereto. These financial statements are prepared by incorporating the accounts of the Trust.

These financial statements are the responsibility of the Management. Our responsibility is to express an opinion on these financial statements based on our audit. We have conducted our audit in accordance with auditing standards generally accepted in India. These standards require that we plan and perform the audit to obtain the reasonable assurance about whether the financial statements are free of material misstatements. An audit includes examining evidence supporting the amounts and disclosures in the financial statements. An audit also includes assessing the accounting principles used and significant estimates made by the management, as well as evaluating the overall financial statement presentation. We believe that our audit provides a reasonable basis for our opinion.

## We further report that :

a) We have obtained all the information and explanations which to the best of our knowledge and belief were necessary for the purposes of our audit.

b) The Balance Sheet and Income & Expenditure Account dealt with in this report are in agreement with the books of account.

c) In our opinion, the Trust has kept proper books of account as required by law so far as it appears from our examination of these books.

d) In our opinion the Balance Sheet and Income & Expenditure Account comply with relevant Accounting Standards.

e) The closing Balance of loans, advances, creditors and deposit as on 31st March 2024 are subject to confirmation and reconciliation.

f) For the purpose of reporting under Sl No.41 relating to specified persons referred to under section 13(3) of the Income Tax Act, 1961, Management has provided the list of specified persons which we have relied upon.

In our opinion and to the best of our information and according to the explanation given to us, these financial statements together with the schedules attached thereto and read with the Accounting Policies and Notes Forming Part of the Accounts give a true and fair view in conformity with the Accounting Principles generally accepted in India :

i] In case of the consolidated Balance Sheet, of the state of affairs of the Trust as on March 31, 2024, and

ii] In the case of the consolidated Income & Expenditure Account, of the income/ application of its accounting year ending on 31st March 2024.

Date : 28/08/2024

Place : Pune

**CA Santosh Pethe**


Partner- M.No. 104973

Torvi Pethe and Company

# आमचे कॉर्पोरेट क्षेत्रातील साहाय्यदाते

- भारत फोर्ज लि.
- बीवायके इंडिया प्रा. लि.
- कॉर्नर स्टोन ऑन डिमांड सर्व्हिसेस इंडिया प्रा. लि.
- डेलवाल फ्लो कंट्रोल्स प्रा. लि.
- डिमेक केमिकल प्रोडक्ट्स प्रा. लि.
- डिमेक प्रायव्हेट लिमिटेड
- एपिरॉक मायनिंग इंडिया लि.
- फिडेल सॉफ्टटेक लि.
- फाईन ऑरगॅनिक इंडस्ट्रीज लिमिटेड
- फ्रॅन्के फेबर इंडिया प्रा. लि.
- एचएनबी इंजिनिअरिंग प्रा. लि.
- मोरडे फुड्स प्रायव्हेट लिमिटेड
- ओटर कंट्रोल्स प्रायव्हेट लिमिटेड
- पी वी टेक्स्टाईल्स
- पर्सिस्टंट फाउंडेशन
- रियालिटी प्रीमीडिया सर्व्हिसेस प्रा. लि.
- रीग्रीन एक्सेल प्रीमिडिया सर्व्हिसेस प्रा. लि.
- रूरल एज्युकेशन ट्रस्ट
- रोश इन्फर्मेशन सोल्युशन्स इंडिया प्रा. लि.
- साई सर्व्हिसेस
- सावा हेल्थकेअर लि.
- सोनाई दूध कंपनी लि. इंदापूर
- सिपोरेक्स इंडिया प्रा. लि.
- टेक्नोफोर इलेक्ट्रॉनिक्स प्रा. लि.
- यामाझाकी मझाक इंडिया प्रा. लि.

### अशी मिळाली कॉर्पोरेट देणगी




# आर्थिक मदत देणारे ट्रस्ट

- स्वाधार
- दिशा परिवार
- आत्मजा फाउंडेशन
- वर्धमान ट्रस्ट
- एन. जी. भोसले ट्रस्ट
- एज्युकेट वन वर्ल्ड इ. व्ही.
- सुपर्णा चॅरिटेबल ट्रस्ट
- मराठवाडा मित्रमंडळ
- एस. टी. भटेवरा फाउंडेशन
- लीला पूनावाला फाउंडेशन
- लेंड अ हॅण्ड इंडिया
- शुटिंग स्टार्टस फाउंडेशन
- महाराष्ट्र फाउंडेशन
- गिरिलता पब्लिक चॅरिटेबल ट्रस्ट
- स्वादी चॅरिटेबल ट्रस्ट
- पंढरीनाथ गोपाळ ठकार एज्युकेशन ट्रस्ट
- सेवा सहयोग फाउंडेशन
- देवी चतु:श्रृगी मंदिर ट्रस्ट
- शंकरराव पाटील चॅरिटेबल ट्रस्ट
- विश्वकर्मा पर्पल एज्युकेशन ट्रस्ट

# मान्यवरांच्या भेटी व कार्यक्रमांची क्षणचित्रे



# समितीच्या कार्यात आपण अशा प्रकारे सहभागी होऊ शकता

(समितीला मिळणाऱ्या देणग्या आयकर खात्याच्या 80 G कलमानुसार कर सवलतीस पात्र आहेत.)



- सामान्य किंवा विशिष्ट कॉर्पससाठी देणगी देणे (उदा. इमारत निधी)
- **अन्ननिधी :** १,१०० विद्यार्थ्यांच्या एकावेळच्या भोजनासाठी येणारा रु. १६,००० इतका तुटवडा भरून येण्यासाठी देणगी देणे.
- समितीला प्रत्येक विद्यार्थ्यामागे एका वर्षात येणारी रु. ३२,००० इतकी तूट भरून येण्यासाठी एका विद्यार्थ्याचा खर्च उचलणे / या विद्यार्थ्याचे मार्गदर्शक / पालक होणे.
- समितीतील हुशार विद्यार्थ्यांना शिष्यवृत्ती देणे.
- समितीला उपयोगी पडतील अशी उपकरणे /वस्तू / पुस्तके यांची भेट देणे.
- समितीच्या कमवा व शिका योजनेखाली एका किंवा जास्त विद्यार्थ्यांना काम देणे.
- CSR/ संस्थात्मक आर्थिक मदत मिळवून देणे.
- समितीचा कार्यकर्ता म्हणून कार्याला वेळ देणे.
- विद्यार्थी विकास केंद्राच्या उपक्रमात विद्यार्थ्यांसाठी उपयुक्त किंवा महत्त्वाच्या विषयांवर व्याख्यान देणे.
- **स्मृतीयोजना :** मुलींसाठी पुण्यात उभारलेल्या नवीन वसतिगृहामध्ये ११२ खोल्या आहेत. या प्रत्येक खोलीला रुपये १० लाखाप्रमाणे देणगी देऊन नामफलक लावण्याची सुविधा उपलब्ध आहे. आपण आपल्या कुटुंबातील आनंदाच्या, स्मृतींच्या प्रसंगी देणगी देऊ शकता. आपल्या या देणगीतून प्रतिवर्षी तीन विद्यार्थिनी आपले उच्च शिक्षणाचे स्वप्न साकार करणार आहेत. ही देणगी सलग दोन किंवा तीन टप्प्यातही देता येईल. आयकर कायद्याच्या ८० जी अंतर्गत दोन-तीन आर्थिक वर्षात याचा फायदा घेता येऊ शकतो.






# विद्यार्थी साहाय्यक समिती, पुणे

(Public Charitable Trust No. E- 219 Pune)
११८२/१/ ४, शिवाजीनगर, फर्ग्युसन कॉलेज रस्ता,
पुणे – ४११००५
E mail –info@samiti.org
www.samiti.org, Mob- 9404855530

आपण देणगी ऑनलाइन जमा केल्यावर पावतीसाठी आपले नाव, पॅन नंबर, पत्ता, मेल आयडी व फोन ही माहिती समितीला info@samiti.org या मेलवर कृपया, कळवावी.

---

देणगीचा धनादेश या नावाने काढावा
**VIDYARTHI SAHAYYAK SAMITI, PUNE**
Donations given are eligible for deduction under sec. 80 G of Income Tax Act.

- Pan No. AAATS4498N
- FCRA No. 083930059

---

## समितीला देणगी देण्यासाठी बँक खात्याची माहिती

स्थानिक (भारतातील) देणगीदारांसाठी

- ICICI Bank : A/C No.000501060326
- IFSC : ICIC0000039
- Branch : Shivajinagar, Pune

---

## परदेशस्थ देणगीदारांसाठी बँक खात्याची माहिती

State Bank Of India, Main Branch,
New Delhi : A/C No. 40282102047
**(FCRA Saving Account)**

- Branch Code – 00691
- IFSC : SBIN0000691
- SWIFT CODE : SBININBB104

समितीच्या पुण्याबाहेरच्या पहिल्या वसतिगृहाची स्वप्नपूर्ती. अहमदनगरमधील कै. म. कृ. ऊर्फ मधुभाऊ चौधरी मुलींसाठीचे वसतिगृह.

